दैनिक लोकशाही
जळगाव next
५ ■ जळगाव, शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ epaper.lokshahilive.com ■

# थोरगव्हाण ग्राम पंचायत उपसरपंचपदी बाळु पाटील

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी



येथून जवळच असलेल्या थोरगव्हाण ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी बाळु पुंडलीक पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. थोरगव्हाण ग्राम पंचायतचे उपसरपंच लताबाई भावलाल पाटील यांनी ठरल्याप्रमाणे एक वर्ष उपसरपंच पद भोगून राजीनामा दिला. त्या रिक्त जागी सरपंच मनिषा समाधान सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत बाळू पुंडलीक पाटील यांच्या एकमेव अर्ज उपसरपंच पदासाठी दाखल झाल्याने बाळु पाटील यांची निवड बिनविरोध करण्यात आली असल्याचे ग्रामसेवक जय कोळी यांनी जाहीर केले. या वेळी ग्राम पंचायत सदस्यं लताबाई पाटील, सुर्यभान पाटील, अनिल भालेराव, वंदना भालेराव, मीना बाई चौधरी उपस्थित होते.

## महत्वाचे



### वाकडी विविध कार्यकारी सोसायटीच्या संचालकपदी कोकिळाबाई पाटील

**चाळीसगाव –** चाळीसगाव तालुक्यातील वाकडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या संचालक, मीनाताई मुरलीधर पाटील ह्या मयत झाल्याने त्यांच्या रिक्त जागी दिनांक ३० जूलै रोजी सदर रिक्त जागेची निवडणूक घेण्यात आली. त्या रिक्त जागांसाठी कोकीळाबाई जुलाल पाटील व राहुल मुरलीधर पाटील यांचे दोन उमेदवारी अर्ज दाखल झाले. एकूण बारा संचालकांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात दोन्ही उमेदवारांना समसमान मते मिळाल्याने दोन्ही उमेदवारांच्या नावांची ईश्वरचिठ्ठी टाकण्यात आली. त्यात ईश्वरचिठीत कोकिळाबाई जुलाल पाटील यांची नावाची निघाल्याने कोकीळाबाई पाटील यांची संचालक म्हणून निवडणूक अधिकारी दीपक सुखदेव शिंदे व सहाय्यक निवडणूक अधिकारी विनायक जठार यांनी केली. निवडणूक अधिकारी म्हणून दिपक शिंदे, सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून विनायक जठार व सचिव म्हणून मोहन अप्पा यांनी कामं पाहीले. कोकिळाबाई संचालक म्हणून अधिकृत घोषणा झाल्यावर सर्वत्र आनंदोत्सव साजरा करण्यात आला अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी त्यांचा निवडीबद्दल प्रकाश पाटील, गुलाब पाटील, अशोक पाटील, संचालक शिवाजी पाटील, सूर्यभान वाघ, संतोष पाटील, किरण सूर्यवंशी, अशोक मोरे, नाना अहिरे यांनी सत्कार केला.

### चिमुकलीसह महिला बेपत्ता !

**जळगाव –** तालुक्यातील शिरसोली येथील राहत्या घरातून कुणाला काहीही न सांगात २५ वर्षीय विवाहिता आपल्या एका वर्षाच्या चिमुकल्या मुलीसह बेपत्ता झाल्याची घटना २८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता समोर आली आहे. याप्रकरणी बुधवारी ३० जुलै रोजी दुपारी ४ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. वत्सलाबाई सुकलाल भिल (वय ७२ वर्षे, रा. शिरसोली, ता. जळगाव) यांनी याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये खबर दिली आहे. वत्सलाबाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी नर्मदा राजू भिल (वय २५ वर्षे) ही २८ जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास घरातून निघून गेली. तिच्यासोबत तिची एक वर्षाची मुलगी नंदिनी राजू भिल देखील आहे. मुलगी व नात बेपत्ता झाल्यानंतर वत्सलाबाई यांनी दोघांचा सर्वत्र शोध घेतला परंतू कोणतीही माहिती मिळाली नाही.
अखेर त्यांनी पोलिसांत हरवल्याची खबर दिली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ धनंजय गुळवे हे करत आहेत.

# कै.वसंतराव रामजी महाजन पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध उपक्रम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी

साकळी येथील शारदा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात कै. वसंतराव रामजी महाजन यांच्या द्वितीय पुण्यस्मरणदिना निमित्ताने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रीडा स्पर्धा, वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रमोद सोनवणे होते तर व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्षा विद्याताई महाजन, संचालक शामकांत महाजन, दिपक महाजन, सुनंदाताई, रामाभाऊ निळे, धनराज माळी, गंगाराम कोळी संचालक मंडळ, प्राचार्य आर जे महाजन, पर्यवेक्षक एस. जे पवार, बी ई महाजन, आर सी जगताप, एन पी पाटील, एम ए महाजन, किरण चौधरी, एस पी निळे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते कै. वसंतराव रामजी महाजन यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर वक्तृत्व केले. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. यात



लहान गटात प्रथम वेदिका मनोज शिरसाळे, द्वितीय– नक्षत्रा हेमंत जोशी तृतीय– आरती विनोद वानखेडे तर मोठ्या गटात प्रथम– योगेश संजय बोरसे, द्वितीय– निकिता जगदीश चऱ्हाटे, तृतीय– चेतना रवींद्र बोरसे यांनी वरील प्रमाणे यश मिळविले. तसेच क्रीडा स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळवला यात वैयक्तिक धावणे स्पर्धा लहान गट मुले : सचिन विनोद कोळी, वरद संदीप तेली, यश शैलेंद्र जंजाळे. मुली : रुचिता समाधान मिस्तरी, काजल ज्ञानदेव माळी, अक्सा रशीद तडवी. मोठा गट मुले : हरीश मनोहर बडगुजर, विशाल कैलास कुंभार, धीरज महेश सपकाळे. मुली : अल्फाज रसूल तडवी, दीपिका संदीप तेली, भैरवी नितीन सुतार. कबड्डी स्पर्धेमध्ये ( मुले ) : लहान गट इयत्ता सातवी संघ, मोठ्या गटात इयत्ता दहावी संघ, खो –खो मुली : लहान गट : इयत्ता सातवी संघ. मोठा गट : इयत्ता आठवी संघ. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून पी एम. पाटील, एस. एस. तडवी, वाय बी सपकाळे, एस. बी सोनवणे, ए पी जाधव सर्व क्रीडा शिक्षक यांनी कामकाज पहिले. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय अश स्वरूपाची बक्षीसे देण्यात येणार आहे. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा विद्या महाजन, अध्यक्ष व संस्थेचे कार्याध्यक्ष प्रमोद सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन पी पाटील यांनी केले व आभार वाय बी सपकाळे यांनी मानलेत.

# सोमवारी महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन




**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी

शासन आदेशानुसार दि ४ ऑगष्ट २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान तालुक्यातील प्रत्येक मंडळनिहाय राबविणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्या अनुषंगाने भडगाव तालुक्यातील मौजे कोळगाव व भडगाव या २ मंडळ भागात दिनांक ४ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजीत करण्यात येत आहे. सदर शिबीरात तालुक्यातील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभाग, सं. गा. यो. , इं. गा. यो, श्रावणबाळ योजना, पंचायत समिती, पोलीस स्टेशन, महाराष्ट्र विज वितरण कंपनी, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, तालुका कृषी विभाग, ग्रामीण रुग्णालय भडगाव, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, उपअधिक्षक भूमी अभिलेख, सहायक निबंधक महकारी संस्था, पशुवैदयकिय अधिकारी, दुय्यम निबंधक नोंदणी व मुद्रांक विभाग, शिक्षण विभाग, वनपरीक्षेत्र कार्यालय पाचोरा/ चाळीसगाव इत्यादी विविध शासकिय कार्यालयामार्फत स्टॉल लावण्यात येणार असून शिबीरात सर्व संबधित विभागातील शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांना स्तनदा माता योजने अंतर्गत बेबी केयर किट, ७/१२ उतारे, जातीचे दाखले, गुणवंत विदयार्थी, ईकेवायसी (नैसर्गिक आपत्ती अनुदान), अंत्योदय योजना लाभार्थी, संगायो / श्रावणबाळ योजना लाभार्थी, उत्पन्न दाखले, डोमीसाईल ॲग्रीस्टॅक, नॉन क्रिमीलेयर दाखले व इतर लाभाचे वितरण करण्यात येणार आहे. सदरच्या शिबीरास भडगाव तालुक्यातील व मंडळ भागातील नागरीकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती तसेच लाभ घ्यावा असे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# नोकर भरतीस इच्छुक तरुणांसाठी पुस्तके व क्रिडा साहित्यांची व्यवस्था

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी

साकळी येथील लोकनियुक्त सरपंच दिपक पाटील यांचेकडे गावातील काही तरूण मुलांनी पोलिस भरतीसाठी लागणारे पुस्तके व क्रीडा साहित्याची मागणी केली होती. तरुण वर्गाच्या भविष्याचा विचार करून तात्काळ निर्णय घेत सरपंच दीपक पाटलांनी या तरुणांसाठी एका दिवसात सर्व क्रिडा साहित्यांची व संबंधित पुस्तकांची व्यवस्था करून दिली.



याबद्दल सर्व मुलांनी ग्रामपंचायत कार्यालयात भेटुन दिपक पाटील आभार मानले. गावातील विवीध शासकीय नोकरभरतीसाठी इच्छुक मुलांनी सध्या तात्पुरत्या स्वरूपात भाड्याने खोली घेवुन या साहित्यासह अभ्यास सुरू केला आहे. विविध शासकीय स्पर्धा परीक्षा– भरती तसेच इतर शैक्षणिक करिअरच्या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या आपल्या गावातील तरूणांना अभ्यासासाठी गावात लवकरच सुसज्ज अभ्यासिका सुरू करणार आहे. आपल्या यासंदर्भात गावाबाहेर नोकरी, व्यवसाय

# रक्षाबंधन निमित्त बटालियनसाठी पाठवली राखी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पिंपळगाव हरे.** प्रतिनिधी

सीमेवर असणाऱ्या जवान बांधव यासाठी रोटरी क्लब पाचोरा भडगाव यांनी इन्टेरेक्ट क्लब मार्फत रक्षाबंधन निमित्त सस्नेह भेट म्हणून संपूर्ण बटालियनसाठी राखी पाठविण्यात आल्या. असा अनोखा कार्यक्रम साठी रोटरी क्लब पाचोरा भडगाव नेहमीच अग्रेसर असते. त्या अनुषंगाने इंटरेक्ट क्लब निर्मल इंटरनॅशनल स्कुल पाचोरा, माध्यमिक उच्चमाध्यमिक विद्यालय कोंडवाडा गल्ली, पी के शिंदे माध्यमिक विद्यालय पाचोरा या




शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी भगिनी यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. यावेळी रोटरी क्लब पाचोरा भडगाव चे अध्यक्ष डॉ मुकेश तेली, सचिव डॉ अजयसिंग परदेशी, रोटरी सदस्य चंद्रकांत लोढाया, संजय कोतकर, शैलेश कुलकर्णी, डॉ प्रशांत सांगडे, डॉ कुणाल पाटील, डॉ नितीन जमदाडे, चिंतामण पाटील यासोबत तीनही शाळेचे मुख्याध्यापक सोमवंशी, गणेश राजपूत, उज्वला महाजन, पाटील, विद्या कोतकर, सागर, हेमंत टोनपे हजर होते. यावेळी इंटरेक्ट क्लबच्या सदस्यांना अध्यक्ष डॉ मुकेश तेली यांचे हस्ते नावाचे बॅच वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब पाचोरा तर्फे सैनिक बांधव यांना मानपत्र पाठविण्यात आले. अशा या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र साहित्य परिषद निमंत्रित सदस्यपदी प्रा.बी.एन.चौधरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धरणगाव** प्रतिनिधी

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अमळनेर शाखेची नुतन कार्यकारिणी नुकतीच जाहिर झाली असून कार्यकारिणीच्या निमंत्रित सदस्यपदी खान्देशातील सुप्रसिध्द साहित्यिक प्रा. बी. एन. चौधरी यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. मसापचे नुतन अध्यक्ष संदीप घोरपडे यांनी एका पत्रान्वये ही घोषणा केली.
प्रा. चौधरी हे लेखक, कवी, व्यंगचित्रकार, पत्रकार, गझलकार, वक्ता म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. त्यांच्या या निवडीने त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाची उचित दखल घेतली गेली आहे.
येत्या वर्षभरात मसापतर्फे गावागावात उपक्रम घेवून महाराष्ट्रातील संताच्या कार्याचा जागर करणे. स्थानिक लेखकांच्या पुस्तकांवर चर्चासत्र घडवून आणणे, तसेच राज्य नाट्यस्पर्धेसाठी नाटकाची निवड करून स्पर्धेत नाटक दाखल करण्याबाबत चर्चा



करून मसापला प्रस्ताव पाठविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.
प्रा. चौधरी यांच्या या निवडीचे अध्यक्ष संदीप घोरपडे, कार्याध्यक्ष रमेश पवार, प्रमुख कार्यवाह दिनेश नाईक, कोषाध्यक्ष उमेश काटे, उपाध्यक्ष भाऊसाहेब देशमुख, कार्यवाह विजया गायकवाड, सदस्य नरेंद्र निकुंभ, डॉ. रमेश माने, दिलीप सोनवणे, निरंजन पेंढारे, गोकुळ बागुल, शरद पाटील, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर मराठे, भारती सोनवणे, सुनिता पाटील, मनोहर नेरकर, मराठी वाडमय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, रणजित शिंदे, प्रा. शाम पवार यांनी अभिनंदन केले आहे.

# वरखेडी विद्यालयात ज्ञानगंगा ॲपचे रोटरीतर्फे वाटप

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरखेडी** प्रतिनिधी

धी शेंदुर्णी एज्यु. को. ऑप सोसा. लि. शेंदुर्णी संचलित श्रीमती पी. डी बडोला माध्यमिक विद्यालय वरखेडी येथे पाचोरा – भडगाव तर्फे रोटरी क्लब तर्फ इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानगंगा ॲपचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रोटरी क्लब पाचोरा भडगावचे अध्यक्ष डॉ श्री मुकेश तेली यांनी भूषविले. सर्वात प्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. संजय कोतकर यांनी विद्यार्थ्यांना ॲप व ॲप मधील माहिती व ग्रामीण भागातील



विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने उपयोगी पडेल याबद्दल माहिती दिली. ॲपची किंमत १७५० रुपये असून १६८५ रुपये रोटरी क्लब पाचोरा यांनी स्वतः दातृत्व दाखवून ग्रामीण भागासाठी फक्त ६५ रुपयांमध्ये ॲप उपलब्ध केले. अरुणा उदावंत मुख्याध्यापिका राजुरी यांनी आपल्याकडून १०८ विद्यार्थ्यांना स्वखर्चाने ६५ रुपये भरून विद्यार्थ्यांना ॲप विनामूल्य दिले. अरुणा उदावंत यांनी ॲप कसे वापरावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर मुकेश तेली यांनी रोटरी क्लब तर्फ राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. व शाळेला रोटरी क्लब तर्फे प्रथमोपचार पेटी भेट म्हणून देण्यात आली. तसेच इ १० वीत मध्ये प्रथम क्रमाकांने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीस अनुक्रमे ११०० बक्षीस अरुणा उदावंत यांनी या प्रसंगी जाहीर केले.
याप्रसंगी डॉ अजब सिंग परदेशी तसेच तसेच रोटरी क्लबचे सदस्य चंद्रकांत लोढाया, चिंतामण पाटील, डॉ प्रशांत सांगडे, डॉ कुणाल पाटील, डॉ. नितीन जगदाडे, दगडू गोसावी तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत गरुड, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व बंधू–भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए एस चव्हाण तर आभार ए ए खान यांनी मानले.

# चोपड्यात तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल भक्ती सोहळा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल हा वारकरी परंपरेचा भक्तीमय गीतांचा कार्यक्रम नाट्यगृह येथे २ ५जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजेला आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात परिवर्तन नाट्य संस्थेचे अध्यक्ष शंभू पाटील व त्यांच्या टीमने भक्तीगीतांचा कार्यक्रम सादर करत अतिशय मंत्रमुग्ध करणारी भक्तिसंगीताची गाणी सादर केली. दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष सुनील पाटील (वाळकी) यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी




मंत्री गुलाबराव देवकर, माजी आमदार दिलीपराव सोनवणे, रवींद्र पाटील(प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस)अरविंद चितोडीया, (युवक जिल्हाध्यक्ष) सोनाली नारायण पाटील (महिला जिल्हाध्यक्ष)युवती जिल्हाध्यक्ष भाग्यश्री ठाकरे, परेश देशमुख (उपजिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस) बाळासाहेब पाटील(तालुकाध्यक्ष)गिरीश देशमुख, (शहर अध्यक्ष) चंद्रकला पाटील (सरपंच) यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख उपस्थिती नारायण पाटील (माजी अध्यक्ष कृउबा) योगेश देसले, ॲड. प्रदीप पाटील, राकेश सोनार, सविता पाटील, माया महाजन, निलेश पाटील, मिलिंद सोनवणे, किरण करंदीकर, सतीश बोरसे सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण पाटील यांनी तर प्रस्तावना सुनील पाटील यांनी केली.

# यावल गटविकास अधिकाऱ्यांकडून शासनाचे नियम धाब्यावर

## प्रत्येक महिन्याला तक्रार निवारण सभा घेणे बंधनकारक असतांना एकही सभा नाही

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रत्येक गटविकास अधिकारी यांनी ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या व तक्रारीच्या निवारणासाठी प्रत्येक महिन्यातील पहिल्या शुक्रवारी यावल पंचायत समिती मध्ये तक्रार निवारण सभा घेणे बंधनकारक असतांना यावल पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी एकदा हि तक्रार निवारण सभा घेतली नसून शासनाचे नियम धाब्यावर ठेवले असल्याचे दिसत आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाच्या परिपत्रकानुसार ३ मार्च २०२० पासून शासनाच्या नियमानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी ग्रामीण भागातील नागरिकांना सभेचे निमंत्रण देऊन ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या व तक्रारीचे निराकरण होणे गरजेचे आहे व तसा अहवाल मुख्यकार्यकारी




अधिकारी यांना सादर करणे बंधकारक असतांना यावल पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांच्या कडून एकदाही महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी तक्रार निवारण सभा घेतल्या गेल्या नाहीत. यावल पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्या असे वाटले नाही काय ? कि ग्रामीण भागातील नागरिकांच्या एकही समस्या नाहीत असे वाटत आहे,असे अनेक प्रश्न यावल पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांच्या विषयी उपस्थित होत असल्यामुळे आता पर्यंत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी तक्रार निवारण सभा न घेण्याचा यावल पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांचा नेमका उद्देश काय आहे? कोणाच्या पाठींब्याने यावल गट विकास अधिकारी इतका धाडस करीत असून शासनाचे नियम धाब्यावर ठेऊन शासनाच्या परिपत्रकाची पायमल्ली करीत आहे? यांची वरीष्ठ स्तरावरून चौकशी होणे गरजेचे असून कर्तव्यात कसूर करण्याऱ्या अश्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी अशी यावल तालुक्यातून मागणी जोर धरत आहे.